INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY – 2017

# लोकसाहित्यातील आदिवासी लोकसंस्कृती स्वरुप



**प्रा. डॉ. दत्तात्रय बारबोले**
**मराठी विभाग प्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज**

## प्रस्तावना :—

आज जगामध्ये अनेक प्रकारच्या संस्कृती पहावयास मिळतात. परंतु आदिवासींची सस्कृती ही आगळी वेगळी संस्कृती आहे. आदिवासी संस्कृतीचा अभ्यास करावयाचा झाल्यास त्यांच्या लोकसाहित्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. आदिवासी लोकसाहित्य हा आदिम संस्कृतीचा एक अनमोल असा ठेवा आहे. आदिवासी संस्कृती ही पूर्णपणे निसर्गाशी निगडीत आहे. जगण्याच्या प्रेरणा त्यांना निसर्गशक्तीतूनच मिळालेल्या आहेत. त्यामुळे या जमाती निसर्गपूजक आहेत. त्यातूनच आदिवसींच्या लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या रुढी, प्रथा, परंपरा, सण-उत्सव, विधी, आचार-विचार तसेच लोककला, लोकगीत, लोककथा, लोकनाट्य, म्हणी, उखाणे, वाक्यप्रचार हे सर्व मौखिक साहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरेने चालत आलेले आहे.

या सर्व आदिवासी मौखिक साहित्याचा समावेश लोकसाहित्यात होतो. या मौखिक परंपरेने चालत आलल्या लोकसाहित्यातच आदिवासींची वैभवशाली संस्कृती दडलेली दिसून येते. ही संस्कृती सहकार्यावरी सानुभुतीवरी प्रेमावर व माणुसकीवर आधारलेली आहे. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या मौखिक परंपरेमध्ये आदिवासींची जगण्याची पध्दती आहे. आदिवासी संस्कृतीमध्ये मानवी मूल्यांची खाण दडलेली असून ही मानवी मूल्यांची खाण अजूनही पूर्णपणे दुर्लक्षित आहे त्यामुळे आदिवासी लोकसाहित्यातील लोकसंस्कृतीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## लोककथा आणि लोकसंस्कृती

आदिवासी लोकसाहित्यातील लोककथा म्हणजे एक सशक्त प्रभावी अंत:प्रवाह होय. आदिवासींच्या लोककथांमध्ये पशुपक्ष्यांच्या कथा निसर्गनिर्मितीसंबंधी कथा यामध्ये शेती, धन धान्य, निसर्ग, सूर्य, चंद्र, वृक्ष, मानवाच्या निर्मिती संबंधी कथा अशा भरपूर कथांमधून आदिवासी लोकसंस्कृतीची चिरंतन मूल्ये चोपासली गेली आहेत. उदा.

१. कोकणांची - डोंगरीदेवी कथा ही धनधान्य, पशू-पक्षी, संरक्षण, सुख शांती व समृध्दतेचे प्रतीक असणारी कथा आहे.
२. कणसरीची कथा - शेतीच्या समृध्दतेसाठी
३. पावरा भिल्लांची महूंची कथा - मानवतेची शिकवण देणारी कथा.
४. वारल्यांची-नारण देवाची कथा - पर्जन्य देवतेचे प्रतीक.

५. माडिया गोंडाची पवित्र कोया - धर्माबध्दल शिकवण देणारी कथा याचबरोबर गौंडाची निर्मिती, कोरकू गोत्र निर्मिती, धरतरी उत्पती अशा अनेक जमातींच्या वेगवेगळ्या कथा असलेल्या दिसून येतात. या मिथक, पौराणिक, दैवत लोककथातून आदिवासींची मानसिक अविष्कार, निसर्गाविष्कार, आदिमतेची जडणघडण व लोकसंस्कृती आदिवासी लोककथामधून प्रतिबिंबीत झालेली आहे.

## लोकदैवते आणि लोकसंस्कृती

आदिवासी जमातीच्या चाली-रिती, रुढी, परंपरा, धार्मिक विधी हे सगळ्या जमातीमध्ये थोड्या फार प्रमाणात सारखेच दिसून येतात. हे सर्व विधी निसर्ग व प्राणी पुजेतून निर्माण झाले आहेत. आदिवासी जमाती या जंगल, डोंगर, दऱ्याखोऱ्यात राहत असून ते पंचमहाभूतांना पुजनिय मानतता. आदिवासी कोकणा, वारली, महादेव कोळी या जमातीमध्ये १) वाघदेवाची पुजा ही गाई गुरांना माणसांना संरक्षण व सुखसमृध्दी मिळण्यासाठी केली जाते. २) कणसरीची पुजा केल्यानंतर धनधान्य भरपुर पिकते. ३) डोंगरी देवाची पुजा ही गावावर संकट किंवा एखाद्या कुटुंबावर संकट, रोगराई इ. आप्तती आली तर ते निवारण्यासाठी केली जाते. ४) नारणदेवीची पुजा ही पाऊस पडावा म्हणून करतात. याचबरोबर हिरवा, वनदेव, गावदेव, धरतरी, सुर्य, चंद्र यांचीही पुजा केली जाते. तसेच पूर्वजांच्या मूर्तीचा प्रतिष्ठापना करुन पुजा केली जाते. या देवतांबरोबरच निसर्गातील बेल, पिंपळ, उंबर या झाडांनाही पवित्र मानतात.

वरिल दैवत पुजेतून आदिवासींचे देवतांशी असलेले नाते त्यांच्या संस्कृतीमधून दिसून येते. त्यामुळे डॉ. शरद व्यवहारे याविषयी म्हणतात. लोकदैवते आणि लोकसंस्कृती यांच्याती नाते अतूट आहे लोकदैवतांना लोकजीवनात अत्यंत श्रध्देचे स्थान प्राचीन काळापासून प्राप्त झालेले असल्याने जीवन जगताना या लोकदेवतांचा लोकांना एक प्रकारचा मानसिक आधार वाटतो. त्यामुळे लोकदैवते ही आदिवासी लोकसंस्कृतीच्या जीवनाचा भागच बनुन गेलेली दिसतात.

## लोकगीते आणि लोकसंस्कृती

आदिवासींचे जीवन म्हणजे गरीबी, कष्ट आणि दारिद्र्य हे त्यांच्या पाचवीलाच पुजलेले आहे. तरी सुध्दा अशा परिस्थितीमध्ये कष्टमय जीवनात आनंद घेण्याची वृत्ती त्यांच्यामध्ये दिसून येते. आदिवासींचा कोणताही विधी हा गाण्याशिवाय पूर्ण होत नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनात लोकगीतांना तेवढेच महत्त्व आहे. दैन्य, दारिद्र्य, उपासमार होत असून हे आदिवासी निरागसपणे जीवनाचा मनसोक्तपणे आनंत लुटताना दिसतात. लोकगीते म्हणजे त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. यामध्ये विधीगीते, सण, उत्सव गीते, लग्नगीते, श्रमपरिहार गीते अशा अनेक प्रकारच्या लोकगीतांमधून आदिवासी संस्कृतीचे दर्शन होताना दिसते.

कापसावानी ढवळा होयजो, हारळीवानी येली जायजो
पिपळावानी खळाळजो, शिदाचा डाहाळा कमरल खोसजो
डोंगरी जायजो, सरकार करजो, दरबार करजो
खोटा पैसा चालवजो नको, बाजार करजो, घर करजो.

कोकणा, वारली, महादेव कोळी या जमातीमध्ये हे विधी गीत विशेषता दिसून येते. बाळ जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी जो विधी केला जातो त्याला पाचवी असे म्हणतात. त्या प्रसंगी हे गीत म्हटले जाते. समाजात जगत वावरत असताना लहानपणीच त्यांच्या मनावर चांगली नितीमूल्य व संस्कार बिंबवले जातात.

निळा पातळ हळदीने भरल, बाई ग लग्नाचं
बाप माझा दोन दिवसाचा, सासरा ग जन्माचा
निळा पातळ हळदीने भरलं, बाई ग लगनाचं
आई माझी दोन दिवसाची, सासू ग जन्माची

लग्न करुन सासरी जाणाऱ्या मुलीला आयुष्यभर सासरी जीवन कंठायचे असते. त्यामुळे माहेरची ओढ कमी करुन सासरी जाण्याची मानसिकता या गीतातून व्यक्ती केली आहे.

अशा अनेक प्रकारच्या सण उत्सव गीते, स्त्री-पुरुषगीते, श्रमपरिहारगीते, लग्नगीते, धार्मिक-विधीगीते यामधून आदिवासींच्या लोकसंस्कृतीचे जतन झालेले आहे. ही लोकगीते म्हणजे त्यांच्या जीवनाचा भागच बनून गेलेली आहेत.

## इतर लोककला आणि लोकसंस्कृती

आदिवासी माणसं ही दैनंदिन काम करुन थकतात तेव्हा एक विरंगुळा म्हणून वेगवेगळ्या लोककलांच्या माध्यमातून जीवनाचा वेगळ्या प्रकारे आनंद लुटताना दिसतात. काही लोककला या धार्मिक विधी म्हणून तर काही लोककला मनोरंजन म्हणून सादर करतात. यामध्ये भोवाडा, मांदळ, तारपा, दंडार, होळी, ढोल इत्यादी नृत्याबरोबरच लोकनाट्य, विधीनाट्ये, शिल्पकला, चित्रकला, काष्टशिल्प, मूर्तीकला या सर्व लोककलांवरती आदिवासीचे जीवन अवलंबून आहे. कारण अन्न, वस्त्र, निवाऱ्या इतक्याच लोककला त्यांच्या जीवनाच्या अविभाज्य अंग बनुन राहिल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या जगण्याची जीवनशैली त्यांच्या लोककलामध्ये दिसून येते. म्हणूनच लोककलांमधून आदिवासी लोकसंस्कृतीचे जीवन प्रतिबिंबीत झालेले दिसते.

आदिवासी लोकसंस्कृती ही जगातील वैभवशाली वारसा लाभलेली लोकसंस्कृती आहे. आदिवासींच्या जीवन जगण्याच्या राहटीतून त्यांच्या लोक संस्कृतीचे दर्शन घडते. अलीकडच्या काळामध्ये विशेषता आदिवासी तरुण हे नोकरी काम-धंद्या निमित्त शहराकडे स्थलांतरित झालेले आहेत. गावाकडे पाठ फिरवल्यामुळे जी आदिवासी मौखिक लोकसंस्कृती आहे ती लोप पावत चाललेली आहे. ही आदिवासी लोकसंस्कृती जतन करुन ठेवावयाची असेल तर मोठ्या प्रमाणात सुशिक्षित आदिवासी तरुण, आदिवासी लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी आदिवासी लोकसाहित्याचा अभ्यास, संशोधन करणे गरजेचे आहे. तरच आदिवासी लोकसंस्कृती टिकून राहण्यास मदत होईल.

## संदर्भ ग्रंथ


१) डॉ. गारे गोविंद (संपादक) - आदिवासी लोककथा कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे (२०१०)
२) डॉ. गारे गोविंद - आदिवासी लोकनृत्यकॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे (२०१०)
३) डॉ. लोहकरे, संजय (संपादक) आदिवासी लोकसाहित्य शोध आणि बोध मेध पब्लिशिंग हाऊस, अमरावती (२०१४)
४) डॉ. चव्हाण बाळासाहेब (संपादक) - लोकदैव (२०१४)
५) डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे (२०१०)
६) डॉ. व्यवहारे शरद - लोकसाहित्य, रंग आणि रेखा, विश्वभारती प्रकाशन, नागपूर (१९९०)
७) डॉ. मांडे प्रभाकर - लोकरंगभुमी, मधुराज पब्लिकेशन पुणे (२००७)
८) डॉ. भोसले द. ता. - लोकसंस्कृती स्वरुप आणि विशेष पद्मगंधा प्रकाशन, पुणे (२००४)
९) सौ. सोनार विजया - कोकणांचे मौखिक वाङ:मय गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद (२०००)
१०) डॉ. लोहकरे संजय - (संपादक) फडकी मासिक, ऑगस्ट (२०१३)